ISSN : 2348-7143
February 2020
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 238 : प्रसार माध्यमे आणि समाज

# प्रसार माध्यमे आणि त्यांचा धोरण निर्मितीवरील प्रभाव : एक अभ्यास

प्रा. एन. ए. पाटील
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
मनमाड, ता. नांदगांव जि. नाशिक

**सारांश :-**

राजकारण व शासनाचे प्रत्येक ध्येय धोरण सामान्य जनतेपर्यंत आणून पोहचवण्यात वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, इंटरनेटच्या माध्यमातून वापरली जाणारी प्रसार माध्यमे यांची खूप महत्वाची भूमिका असते. या साधनांद्वारे एकाच वेळी खूप मोठ्या संख्येने जनतेशी संपर्क साधला जातो. त्यामुळे त्यांना सामुहिक संपर्क माध्यम असे म्हटले जाते.

प्रसार माध्यमांच्याद्वारे देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, परराष्ट्रविषयक अशा विविध घडामोडींची माहिती जनतेला होत असते. त्यातून एकाच घटनेबद्दल वेगवेगळ्या नेत्यांची तसेच वेगवेगळ्या पक्षांची मते कशी आहेत हे जनतेला कळत असते. यातून जनतेच्या क्रिया प्रक्रिया कशा आहेत, शासन जनतेसाठी कोण-कोणती धोरणे राबवत आहे ते जतनेच्या हिताचे की, अहिताचे हे निरपेक्ष व स्वातंत्र्य ठेवून विश्लेषण करणाऱ्या प्रसार माध्यमांच्या माध्यमातून जनतेला व शासनाला कळत असते. शासनाला धोरण ठरवत असताना प्रसारमाध्यमातून आलेल्या जनतेच्या क्रिया-प्रतिक्रीया ही कळतात व यातून शासनाच्या धोरण निर्मितीवर प्रसार माध्यमांचा प्रभाव खूप मोठ्या प्रमाणात पडत असतो. त्यामुळे शासनाच्या धोरण निर्धारणात प्रसारमाध्यमांची भूमिका खूप महत्वाची ठरत असते.

**बिजशब्द :-** प्रसारमाध्यमे, शासन, सरकार, धोरण, निर्णय, अंमलबजावणी, कायदे, माहिती.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

१. प्रसारमाध्यमांचा अभ्यास करणे.
२. शासनाच्या धोरण निर्मितीतील प्रसारमाध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
३. प्रसारमाध्यमांशी संबंधीत असलेल्या संविधानातील तरतुदींचा अभ्यास करणे.

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मुलभूत हक्कापेक्षा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लाभ होऊन एक नवी जीवनदृष्टी लाभल्यामुळे भारतीय प्रसार माध्यमांनी आपले वेगळे स्थान निर्विवादपणे निर्माण केले आहे. ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात गोपनीयतेचा कायदा लागू केला गेला होता, या कायद्यामुळे प्रशासकीय विविध प्रकारच्या माहितीपासून प्रसार माध्यमांना व नागरीकांना वंचित राहावे लागत होते. जुलमी पध्दतीने शासन करणाऱ्या ब्रिटीशांविरूध्द आवाज उठवण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या लेखणीचा प्रभावी वापर केला. त्यावेळी आपल्या लेखीणतून अनेक क्रांतिवीर जन्माला आले आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्तता मिळवण्यासाठी लेखणीतून आणि नेत्यांच्या भाषणांतून प्रवृत्त होऊन जनतेने ब्रिटीशांविरूध्द स्वातंत्र्यासाठी यशस्वीपणे लढा दिला. यात तत्कालीन देशभक्त प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची राहिली आहे. पुढे स्वातंत्र्योनर काळातील प्रसारमाध्यमांची भूमिका ही देशाच्या व राज्याच्या धोरण निर्धारणामध्ये महत्वाची भूमिका राहिली आहे.

वर्तमानात भारतातील प्रसारमाध्यमात विभिन्न प्रकारच्या संवाद माध्यमांचा समावेश होतो. उदा. दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट, वर्तमानपत्र, नियतकालीके आणि इंटरनेटवर आधारीत वेबसाईटस समाजामध्ये (सोशल मिडीया) इत्यादी सद्यस्थितीत भारतात सत्तर हजारांपेक्षा अधिक वर्तमानपत्रे आणि ५०० पेक्षा जास्त उपग्रह वाहिण्या पैकी जवहपास शंभर वृत्तवाहिन्या आहेत. वर्तमानपत्रासाठी भारत ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे.

**भारतीय संविधानातील वृत्तपत्रांशी संबंधीत कलमे व तरतुदी :-**

भारतीय संविधानाने वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देत असतांना काही तरतूदी केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय संविधानाच्या कलम १९ (१) नुसार भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात आले आहे. हे वृत्तपत्रांना सुद्धा लागू आहे.
२. कलम ३६१ - अ संसद आणि राज्य विधिमंडळाच्या कार्यवाहीच्या प्रसिध्दीचे संरक्षण देण्यात आले आहे.
३. कलम ३६१-अ(१) : संसदेचे कोणतेही सभागृह किंवा राज्यातील विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या कामकाजाचे यथातथ्य वार्तांकन वृत्तपत्रामध्ये प्रकाशित केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर केणत्याही न्यायालयामध्ये दिवाणी वा फौजदारी कार्यवाही केली जाणार नाही, मात्र असे वार्तांकन असत्य पूर्वगृहदूषित असेल तर ही बाब लागू ठरणार नाही. परंतु संदेच्या किंवा विधिमंडळाच्या कोणत्याही गुप्त बैठकीच्या कामकाजाचे यथातथ्य देखील वार्तांकन करण्यास सक्त मनाई आहे.

थोडक्यात वरील काही वृत्तपत्रांशी संबंधीत कलमे व तरतूदी असून या व्यतिरिक्त स्वतंत्र वृत्तपत्र अधिनियमांचे व कायद्यांचे वर्तमानपत्रांनी स्वत:चे नियमन करण्यासाठी स्थापन केलेल्या प्रेस परिषदेचे (Press Council of India) च्या नियमांचे पालन करणे प्रत्येक प्रसार माध्यमांना बंधनकारक असते.

**प्रसार माध्यमांचा धोरण निर्मितीवरील प्रभाव :-**

नागरिक आणि शासन यांच्यातील दुवा म्हणून प्रसारमाध्यमे कार्य करत असतात. त्यामुळे शासन नवीन धोरण तयार करीत असताना



Scanned with CamScanner